नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५४ Issue - 254 | वार मंगळवार दि. ३ फेब्रुवारी २०२६ Blow- Tuesday Date 3 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अजितदादांचा मृत्यू संशयास्पद; न्यायालयीन चौकशी करा

## अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर संजय राऊतांनी राज्यसभेत केली मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर आता अनेक सवाल उपस्थित होत आहेत. विमान कंपनी असेल, अजित पवारांचे गेल्या काही दिवसांतील जाहीर भाषणे असतील किंवा इतरही मुद्दे उपस्थित करत या विमान अपघाताची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. विमान अपघात हा घातपात आहे का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. शिवसेना खासदार संजय राऊतांनी आज सकाळीच पत्रकार परिषदेतून भाजपवर हल्लाबोल केला होता. त्यानंतर, आज राज्यसभेतील भाषणातही त्यांनी अजित पवारांच्या अपघाती निधनावरुन प्रश्न उपस्थित केला आहे. १५ जानेवारी रोजी अजित पवारांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केले आणि १० दिवसांतच त्यांच्या विमानाचा अपघात झाला, यावरुन संजय राऊतांनी शंका उपस्थित केल्या आहेत.



१५ जानेवारी रोजी अजित पवारांनी वक्तव्य केलं होतं, तेव्हा सिंचन घोटाळ्यात भाजपने मोठ्या प्रमाणात पैसे खाल्ल्याचा आरोप केला होता. भाजपच्या या घोटाळ्याची फाईल माझ्याकडे आहे, असेही अजित पवारांनी म्हटलं होतं. त्यानंतर, १० दिवसांतच विमान दुर्घटनेत अजित पवारांचा मृत्यू होतो ही घटना रहस्यमय आहे, असे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी संसदेत नेटाने म्हटले. यावेळी, तुमची वेळ संपली आहे, आजचा हा विषय नाही असेही राज्यसभेतील सभापतींनी म्हटले होते. मात्र, संजय राऊत यांनी आपले म्हणणे मांडले.

अजित दादांवर ७० हजार कोटींचा आरोप केला, ते तुमच्या सत्तेसोबत येऊन बसले. मात्र, भाजपने सिंचन घोटाळ्यात पैसा खाल्ला आहे असा आरोप अजित पवारांनी केला होता. त्या संदर्भातील फाईल ते कायम स्वत:सोबत ठेवायचे, बारामतीला जातानाही ती फाईल त्यांच्या सोबत होती. मात्र, बारामती येथे विमान दुर्घटनेत अजित पवारांचा मृत्यू झाला. या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हायला हवी, अजित पवारांचा अपघात पाहून मला जस्टीस लोयांची आठवण झाली, असेही संजय राऊतांनी राज्यसभेतील भाषणात शंका उपस्थित करत ठामपणे म्हटले.

अजित पवारांचा मृत्यू संशयास्पद आहे. त्याची न्यायालयीन चौकशी व्हायला हवी, अशी मागणी संजय राऊतांनी संसदेत केली. मला आज न्यायमूर्ती लोया यांची आठवण येते. अजित पवार यांच्या सोबत घातपात तर नाही घडवला, असा सवाल त्यांनी विचारला.

**संजय राऊतांचं मानसिक संतुलन बिघडलं - विखे पाटील**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या झालेल्या विमान अपघाताबाबत अनेकांनी शंका उपस्थित केली आहे. आमदार अमोल मिटकरी यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट करत शंका उपस्थित केली. तर, अजित पवारांकडे भाजपच्या घोटाळ्याची फाईल होती, असं सांगितल्यानंतर काही दिवसातच त्यांचा अपघात होतो असेही संजय राऊत यांनी म्हंटल. त्यावर, राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाष्य केले. या अपघाताच्या चौकशीबाबत स्वतः मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या आहेत. संजय राऊत यांचं मानसिक संतुलन बिघडलं आहे, म्हणूनच ते अशी बेताल वक्तव्य करत असल्याची टीका राधाकृष्ण विखेंनी केली.

# हरित महाराष्ट्रसाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



- हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश
- वृक्ष लागवड मोहिमेत स्टार्टअपचा सहभाग घ्यावा
- रोप निर्मितीसाठी खासगी नर्सरी व बचतगटांचा सहभाग घ्यावा

मुंबई : पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण - ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवास्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा. स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल.

मराठावाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित (पान २ वर...)

# राज्यातील गरीब शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गरीब शेतकऱ्यांची सरकारकडून कर्जमाफी केली जाणार आहे. शेतकरी कर्जमाफीचा दिलेला शब्द सरकार नक्की पाळेल, असा ठाम विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. फार्महाऊसधारक किंवा धनदांडग्या शेतकऱ्यांचा विचार न करता, वर्षानुवर्षे शेतात राबणाऱ्या गरीब शेतकऱ्यांसाठीच कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. कर्जावर व्याज आणि व्याजावर व्याज वाढत असल्यामुळे शेतकरी आत्महत्येचा विचार करतो, मात्र अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही. गरीब शेतकऱ्यांची कर्जमाफी (त्रीशी श्रेरप) सरकार करणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितले. धाराशिव जिल्ह्यातील येणेगुर येथे झालेल्या सभेत त्यांनी हे वक्तव्य केलं असू, पुढील काळात शेतकऱ्यांना कर्ज घ्यावं लागू नये, असा विचारही सरकार करत असल्याचं त्यांनी म्हटले आहे. गरीब शेतकरी ४० - ४० वर्षे शेतात राबतात. कर्जबाजारी होऊन आत्महत्येचा विचार करतात. या शेतकऱ्यांना आम्ही आत्महत्या करू देणार नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या या वक्तव्यामुळे महायुती सरकारकडून लवकरच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता राज्य सरकार कर्जमाफीच्या निर्णयाची घोषणा कधी करणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मात्र, बावनकुळे यांनी फक्त गरीब शेतकऱ्यांनाच कर्जमाफी मिळेल, असे म्हटले आहे. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांच्या निकषात नेमके कोणते शेतकरी बसणार आणि कोणत्या शेतकऱ्यांना वगळले जाणार, शेतकऱ्यांची गरिबी ठरवण्याचा मापदंड काय असणार, हे प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

# भारतावरील टॅरिफ २५ वरुन १८ टक्क्यांवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत फोनवर चर्चा केली. या चर्चेत नरेंद्र मोदी यांनी रशियन तेल खरेदी थांबवण्यास सहमती दर्शवली. ते अमेरिका आणि प्रामुख्यानं व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करतील, असा दावा ट्रम्प यांनी केला. यामुळं रशिया आणि यूक्रेन युद्ध थांबवण्यास मदत होईल. यामुळं भारतावर आकारलं जाणारं परस्पर शुल्क २५ टक्क्यांवरुन १८ टक्क्यांवर आणत असल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत बोलणं सन्मानाचं आहे. ते माझे चांगले मित्र आहेत आणि त्यांच्या देशातील ताकदवान आणि सन्माननीय नेते आहेत. आम्ही बऱ्याच गोष्टींवर बोललो. यामध्ये व्यापार, रशिया युक्रेन युद्ध संपवणे याचा समावेश आहे. रशियन तेल खरेदी थांबवण्यास त्यांनी सहमती दर्शवली ते अमेरिकेकडून अधिक तेल खरेदी करतील प्रामुख्यानं व्हेनेझुएलाकडून असं ट्रम्प यांनी म्हटलं. याची युक्रेनमधील युद्ध संपवण्यास मदत होणार आहे. जे युद्ध सध्या सुरु आहे. प्रत्येक आठवड्याला हजारो व्यक्ती मरत आहेत.

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी करारवर आमच्यात सहमती झाली आहे. त्यामुळं अमेरिकेनं रेसिप्रोकल टॅरिफ कमी करण्याचा निर्णय घेतला असून ते २५ टक्क्यांवरुन १८ टक्क्यांवर आणत आहोत. आता ते देखील त्यांच्याकडील टॅरिफ चे दर कमी करण्याचे प्रयत्न करतील. अमेरिकेसोबत टॅरिफचा अडथळा येऊ नये म्हणून झीरो टॅरिफच्या दिशेनं प्रयत्न होतील, अशी अपेक्षा ट्रम्प यांनी वर्तवली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी मोठ्या प्रमाणात अमेरिकेकडून खरेदी करण्यास कटिबद्ध असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. ५०० अब्ज डॉलर्सची अतिरिक्त खरेदी ज्यामध्ये अमेरिकन ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी, कोळसा आणि इतर उत्पादनांचा समावेश असेल. भारतासोबतचे संबंध आणखी मजबूत होतील, असं ट्रम्प म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मी आम्ही दोघं हे पूर्ण होईल हे पाहू. अधिक काही बोलण्याची गरज नाही, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अगोदर भारतावर २५ टक्के टॅरिफ लादलं होतं. त्यानंतर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं भारतावर लादलं होतं. ट्रम्प यांनी भारतावरील टॅरिफ २५ टक्क्यांवरुन १८ टक्के करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळं भारतावर नेमकं टॅरिफ किती याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

'कैलास पर्वतावर चिनी रणगाडे, भारतीय भूमीत तंबू ठोकले'

माजी जनरल नरवणेंच्या पुस्तकातील उल्लेख राहुल यांनी संसदेत मांडला

# चीनच्या घुसखोरीवरून मोदी सरकारवर राहुल गांधी यांचा हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर राहुल गांधी यांनी आज चीनच्या घुसखोरीवरून मोदी सरकारवर हल्लाबोल केला. माजी जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या पुस्तकातील संदर्भ वाचून दाखवण्याचा प्रयत्न केला. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कडाडून विरोध करताना त्यांना वाचू दिलं नाही. दुसरीकडे या पुस्तकात संरक्षण मंत्री आणि पंतप्रधानांचं कॅरेक्टर असल्याचे राहुल म्हणाले. राहुल गांधी म्हणाले, डोकलाममध्ये चिनी रणगाडे भारतीय हद्दीत घुसले होते. मी एका मासिकाच्या लेखाचा उल्लेख करत आहे ज्यामध्ये माजी लष्करप्रमुख नरवणे यांचे आत्मचरित्र उद्धृत केले आहे. राहुल म्हणाले, मी जे वाचत आहे ते तुम्ही सर्वांनी काळजीपूर्वक ऐका; त्यावरून कोण देशभक्त आहे आणि कोण नाही हे स्पष्ट होईल. डोकलाममध्ये चार चिनी रणगाडे भारतीय हद्दीत घुसत होते. ते फक्त १०० मीटर अंतरावर होते.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांना अडवले, त्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहात पुस्तक ठेवण्याचा आग्रह धरला. जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी २०१९ ते २०२२ पर्यंत लष्करप्रमुख म्हणून काम केले. राहुल गांधींच्या भाषणामुळे ४६ मिनिटे गोंधळ उडाला. सभापती ओम बिर्ला यांनी प्रत्येक वेळी भाषण करताना त्यांना अडवले आणि नियमांचा उल्लेख केला. राजनाथ सिंह, शाह, रिजिजू आणि निशिकांत दुबे हे देखील त्यांना विरोध करताना दिसले. नरवणे यांचे आत्मचरित्र, फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी, प्रकाशित झालेलं नाही. माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांचे आत्मचरित्र, फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी, लिहिले गेलं आहे. पेंग्विन पब्लिकेशन्स ते प्रकाशित करणार आहे. तथापि, ते



अद्याप प्रकाशित झालेले नाही.

**लोकसभेत घडलेल्या घटनांचा क्रम वाचा**

राजनाथ सिंह उभे राहिले आणि म्हणाले, जर या गोष्टी प्रकाशित झाल्या असतील तर त्यांचा उल्लेख करा, अन्यथा त्या सोडून द्या.

सभापती ओम बिर्ला म्हणाले, राहुलजी, तुम्ही सभागृहातील विरोधी पक्षनेते आहात. खासदार प्रियांका यांनी काहीतरी सांगितले होते आणि त्यांनी ते प्रामाणिक पातळीवर मांडले. मी तुम्हालाही आवाहन करतो.

राहुल म्हणाले, हे १०० टक्के खरे आहे. राजनाथ सिंह म्हणाले, राहुल यांनी हे प्रकाशित झाले आहे की नाही ते सांगावे. फक्त ते मला सांगा. लोकसभेत एनडीए आणि विरोधी पक्षांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली.

ओम बिर्ला म्हणाले, संरक्षणमंत्री बरोबर आहेत. तुम्ही सभागृहात याचे उत्तर द्यावे. तुम्ही सभागृहात आहात, विरोधी पक्षनेते, योग्य नियमांचे पालन करा.

राहुल म्हणाले, नरवणे यांच्या पुस्तकात संरक्षणमंत्री आणि पंतप्रधानांचा उल्लेख आहे. मी तुम्हाला तेच सांगत आहे.

राजनाथ सिंह म्हणाले, राहुल ज्या पुस्तकाबद्दल बोलत आहेत ते प्रकाशित झालेले नाही. अमित शहा म्हणाले की हा एक मासिकाचा अहवाल होता आणि नरवणे यांनी तसे म्हटले नव्हते. मासिके काहीही लिहू शकतात.

ओम बिर्ला म्हणाले की सभागृहात फक्त वर्तमानपत्रातील कात्रणे वापरली जाऊ शकतात; इतर काहीही सादर केले जाऊ शकत नाही.

राहुल म्हणाले, हे सर्व नरवणे यांनी सांगितले होते. त्यांचे पुस्तक प्रकाशित करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.

अमित शाह म्हणाले, राहुल यांनी स्वतः म्हटले आहे की पुस्तक प्रकाशित झाले नाही. आता प्रकरण संपले आहे. प्रकाशित न झालेल्या पुस्तकाचा उल्लेख तुम्ही कसा करू शकता?

ओम बिर्ला यांनी मायक्रोफोन नियंत्रण बंद करण्याचे निर्देश दिले.

राजनाथ सिंह म्हणाले, राहुल, कृपया सभागृहाच्या नियमांचे उल्लंघन करू नका.

राजनाथ सिंह म्हणाले, मला फक्त राहुल यांनी ते पुस्तक आणावे असे वाटते. मला ते पहायचे आहे. मी खात्रीने सांगू शकतो की पुस्तक प्रकाशित झालेले नाही.

राहुल गांधी म्हणाले, एक मासिक आहे ज्यामध्ये एक लेख आहे आणि मी ते उद्धृत करत आहे.

राजनाथ यांनी लोकसभा अध्यक्षांना सांगितले की सभागृहात या विषयावर बोलण्याची परवानगी देऊ नये.

अखिलेश यादव म्हणाले, चीनचा मुद्दा संवेदनशील आहे. जर तो राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषय असेल तर राहुल गांधींना वाचण्याची परवानगी दिली पाहिजे.

किरेन रिजिजू म्हणाले, आम्ही येथे ऐकण्यासाठी बसलो आहोत. सभापतींनी आधीच निर्णय दिला आहे, पण ते अजूनही वाचत आहेत. हे कसे चालेल?

ओम बिर्ला म्हणाले, सभेत प्रत्येकाला आपले विचार व्यक्त करण्याचा अधिकार आहे. पण आपण नियमांचे पालन केले पाहिजे.

राहुल गांधी म्हणाले, ते खासदार होते आणि त्यांनी राजकारणाबद्दल नाही तर आमच्या चारित्र्याबद्दल बोलले. त्यांनी म्हटले की आम्ही देशद्रोही आहोत.

अमित शाह म्हणाले, मी तेजस्वी यांचे भाषण काळजीपूर्वक ऐकले. त्यांनी विरोधकांच्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही. ते सरकारच्या हेतूंबद्दल बोलले. राहुल गांधी म्हणत आहेत की ते आमच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. ते विचारत आहेत की त्यांना कोणी सांगितले की चिनी टँक आले आहेत.

## संपादकीय....

### वृक्ष लागवड मिशन

पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी नुकतेच दिले. प्रस्तावित हरित प्राधिकरण - ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवास्थानी आढावा बैठक झाली. राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा.स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल. मराठावाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येणार आहे.

# सोलापूर विकासाची बुलेट ट्रेन आत्ता सुसाट वेगाने धावेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर महानगरलिकेच्या महापौर पदासाठी ॲड. श्री विनायक दादा कोंडयाल यांचे व उपमहापौर पदासाठी सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर यांचे नांव निश्चित झाल्याचे समजले आणि येत्या काळात सोलापूरच्या विकासाची बुलेट ट्रेन सुसाट वेगाने धावणार याची मनाला पक्की खात्री पटली.

पालिकेच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच (पुलोदचा अपवाद वगळता) सत्तेत येणाऱ्या भाजपाचा २०१७ ते २०२२ हा कार्यकाळ दुर्दैवाने जनतेच्या अपेक्षांना पूर्ण करणारा ठरला नाही. याकाळात पक्षांतर्गत गटबाजीमुळे सभा तहकूब होण्याचा विक्रम, त्यानंतर कोविड महामारीचे संकट यामुळे स्थानिक भाजपाला याकाळात विशेष छाप पाडता आली नाही हे कटूसत्य आहे.

यंदा मात्र सभागृहनेता, महापौर, उपमहापौर निवडीमध्ये पक्षाने योग्य समन्वय साधत सक्षम नेतृत्वालाच संधी दिल्याचे पाहायला मिळते. समाजमाध्यमांमधून वेगवेगळ्या नावांसाठी सुरू असलेले लॉबिंग पाहता विनायक दादा कोंडयाल यांच्या नावाला विरोध दर्शविणाऱ्यांचे दोन गट पडतात असे वाटते. एक गट म्हणजे आपल्याला अपेक्षित नांव आले नाही म्हणून नाराज झालेला एक वर्ग आणि दुसरा गट म्हणजे विनायक दादा भाजपा मध्ये नवे आहेत, किंवा ते आमदार देवेंद्र दादा कोठे यांचे भाऊजी आहेत म्हणून विरोध करणारा गट. या पदासाठी इच्छुक असणारी इतर मंडळी निश्चितच सक्षमच होती, त्यामुळे त्यांच्या समर्थकांची भावना समजू शकतो. परंतु, अशा वेळी कुणालातरी एकालाच संधी मिळू शकते. इतरांनी त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करत राहिल्यास अशा एखाद्या पदावर भविष्यात वर्णी लागू शकते, हे ध्यानात घ्यावे. विरोधाचा दुसरा मुद्दा मात्र अत्यंत तकलादू आहे असं मला वाटतं. त्याची काही कारणे मी माझ्या परीने इथे देण्याचा प्रयत्न करतोय –

एखाद्या पदावर नेमणूक करताना कुण्या एका बड्या व्यक्तीचा नातेवाईक असल्याने त्याची क्षमता नसताना नेमणूक होत असल्यास निश्चितच ती गैर असते, इतरांवर अन्याय करणारी ठरते. मात्र, त्याचवेळी आपण हा देखील विचार केला पाहिजे की, पदाला न्याय देण्यास पूर्णपणे पात्र असणाऱ्या, पदाचा विनियोग जनहितासाठी करण्याची कुवत असणाऱ्या एखाद्या कार्यक्षम व्यक्तीला त्याच्या स्वत:च्या कार्यकर्तृत्वावर, स्वत:च्या गुणवत्तेवर पद देताना केवळ तो कुणाचा तरी नातेवाईक आहे म्हणून डावलणे पण योग्य ठरणार नाही ना ?



ॲड. श्री विनायक दादा कोंडयाल हे २००७ मध्ये वयाच्या २१ व्या वर्षी पहिल्यांदा अपक्ष निवडून आले. विनायक नगर, सुनील नगर या हद्दवाढ भागाचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी स्व. महेश अण्णा कोठे यांच्या आशीर्वादाने विकासाची गंगोत्री या भागात आणली. ज्या भागात टँकरने पाणीपुरवठा केला जायचा, त्या भागात मोठ्या प्रमाणात जलवाहिनी टाकल्या. स्थायी समिती सभापतीपदी त्यांची वर्णी लागली आणि या भागातील सांडपाण्याचा प्रश्न त्यांनी मिटवला. या विकास कामांच्या आणि अतिशय विनम्र, मनमिळाऊ स्वभावाच्या जोरावर पुढे २०१२ मध्ये कोंग्रेस आणि २०१७ मध्ये शिवसेनेच्या चिन्हावर त्यांना लोकांनी भरघोस मतांनी निवडून दिलं. कमी बोलणारे, मात्र जास्त कामे करणारे अशी विनायक दादांची प्रतिमा आहे. म्हणूनच यंदाच्या निवडणुकीत सोलापूर शहरात सर्वाधिक मताधिक्याने (१४ हजार पेक्षा जास्त मतांचा लीड) नागरिकांनी त्यांना विजयी केले आहे.

विनायक दादा कोंडयाल यांनी नुकताच भाजपामध्ये प्रवेश केलेला आहे असं मानणाऱ्या लोकांना मला आवर्जून सांगावेसे वाटते की, २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत देवेंद्र दादा कोठे यांचे बॅकबोन म्हणून विनायक दादा खंबीरपणे पाठीशी उभे होते. त्यानीच निवडणूक यंत्रणा अतिशय शांतपणे हाताळली होती. शिवाय फेब्रुवारी २०२५ मध्ये भाजपा सदस्य नोंदणी मोहिमेत १००० सदस्य नोंदणी विनायक दादा यांनी केलेली आहे. मागील वर्षभरात पक्षाच्या प्रत्येक उपक्रमात त्यांचा सहभाग उल्लेखनीय राहिलेला आहे. मुख्यमंत्री मा देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात त्यांनी स्वत: शंभयरापेक्षा अधिक रक्तदात्यांना आणून सहभाग नोंदविला. पक्षाने तिरंगा यात्रेचे आयोजन केले, त्यामध्ये सुद्धा विनायक दादा बहुसंख्येने सामील झाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भाजपा कडून राबविलेल्या उपक्रमात ते उत्स्फूर्तपणे सहभागी होते.

आजवरची विनायक दादांची ही वाटचाल बघता आणि सभागृहनेते म्हणून त्यांना मिळणारी नरेंद्र काळे यांची साथ बघता यंदा नक्कीच महानगरपालिकेचे कामकाज सर्वांना सोबत घेऊन एकदिलाने केले जाईल याचा विश्वास वाटतो. सभागृहात १०२ पैकी ८७ नगरसेवक भाजपाचे असल्याने शहर विकासाचा, लोक हिताचा कोणताही निर्णय घेताना अडचण येणार नाही. शिवाय, अलिकडच्या काळात समतोल पणीपुरवठ्याचा विषय असो की विमान उड्डाणाचा विषय, इथे आयटी पार्क सुरू करण्याचा विषय असो की इथल्या औद्योगिक वसाहतीमध्ये मूलभूत सुविधेसाठी निधी देण्याचा विषय असो राज्याचे मुख्यमंत्री मा. देवाभाऊ स्वत: लक्ष घालून मदत करत आहेत. सोलापूरच्या सुदैवाने पहिल्यांदाच सोलापूरला इतका वेळ देणारे आणि प्रशासनावर मजबूत पकड असणारे तसेच शासन दरबारी ज्यांच्या शब्दाला वजन आहे असे पालकमंत्री मा. जयकुमार भाऊ गोरे यांच्या रूपात लाभले आहेत. महानगर पालिकेच्या कारभाराचा खडान् खडा माहिती असणाऱ्या कोठे कुटुंबातील उमदे नेतृत्व आ. देवेंद्र दादा कोठे हे कायमच सोलापूरच्या विकासाचे व्हीजन ठेऊन कार्यरत आहेत. त्यांची जिद्द, चिकाटी आणि निधीसाठी असणारा त्यांचा सततचा पाठपुरावा एव्हाना सर्वसामान्य सोलापूरकरांच्याही लक्षात आलेला आहे. सोबतीला कमी तिथे आम्ही म्हणत मदतीला धावून येणारे, समन्वयाचा दुआ साधणारे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी या सगळ्या बाबी लक्षात घेता आत्ता शहराच्या विकासाचा रथ बुलेट ट्रेनच्या गतीने धावेल यामध्ये तीळमात्र शंका नाही.

इथली परिवहन व्यवस्था (बससेवा), शहराची स्वच्छता, नियमित आणि वेळेवर पुरेशा दाबाने अपेक्षित असलेला स्वच्छ पाणीपुरवठा, पर्यावरण दृष्ट्या धुळमुक्तीसाठी करावयाच्या उपाययोजना, पालिकेच्या आरोग्य सुविधेत करावी लागणारी सुधारणा, रखडलेल्या अमृत योजनेतील ड्रेनेज लाईनची जोडणी, पूर्वनियोजित उड्डाणपूल, रिंगरोड, उद्योग-व्यवसायाला चालना देणे अशी आव्हाने या नव्या कारभाऱ्यांसमोर असतील. निश्चितच सोलापूरकरांच्या अपेक्षा ही टीम पूर्ण करेल, त्याकरिता टीमचे कॅप्टन ॲड. श्री विनायक दादा कोंडयाल यांच्यासह उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर आणि संपूर्ण टीमला मन:पूर्वक शुभेच्छा !

**– गुरुशांत धुत्तरगांवकर**

# सिंहस्थ कुंभमेळ्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे : केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे, असे निर्देश केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी आज दिले.

केंद्रीय मंत्री श्री. शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ पायाभूत सुविधा व तयारी कामकाजाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. शेखावत म्हणाले की, कुंभमेळ्याचे मोठे अध्यात्मिक महत्व आहे. त्याचे प्रतिबिंब रामकाल पथमध्ये उमटले पाहिजे. रामकाल पथ साकारताना स्थानिक वास्तू कलेशी सुसंगत रचना करावी. तसेच रंगसंगतीच्या माध्यमातून भाविकांना रामायण काळाची माहिती होईल, असे नियोजन करावे. त्यासाठी चित्रकला शाखेच्या स्थानिक विद्यार्थ्यांची मदत घ्यावी. कुंभमेळ्याचे नियोजन करताना महिला, तरुणांसह समाजातील विविध घटकांचा सहभाग घ्यावा. कुंभमेळ्यानिमित्त तैनात अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यशाळा घ्यावी. त्यात त्यांना कुंभमेळ्याचे महत्व याविषयीची माहिती द्यावी.

कुंभमेळ्यानिमित्त देश-विदेशातून भाविक येतील. त्यांच्यासाठीच्या पायाभूत सोयीसुविधा वेळेत पूर्ण कराव्यात. या कालावधीत मोबाईल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी आतापासूनच उपाययोजना कराव्यात. रामकाल पथसह उर्वरित विविध विकास कामांसाठीचा प्रस्ताव राज्य शासनाच्या माध्यमातून तातडीने सादर करावा. तसेच त्र्यंबकेश्वर येथील विकास कामांचा समावेश असलेला परिपूर्ण आणि सर्वसमावेशक आराखडा सादर करावा. गर्दी व्यवस्थापनाचे सूक्ष्म नियोजन करावे. भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी पाणी उपलब्ध होईल, असे नियोजन करावे. तसेच भाविकांसाठी हेल्पलाइन सुविधा कार्यान्वित करावी. नाशिकसह जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनाला मोठी संधी आहे. त्यादृष्टीने ब्रॅण्डिग करावे. नाशिक, त्र्यंबकेश्वर हवाई दळण- वळणाच्या सुविधा उपलब्ध होऊ शकतात का याची पडताळणी करावी, अशाही सूचना केंद्रीय मंत्री श्री. शेखावत यांनी केल्या. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम, कुंभमेळा आयुक्त श्री. सिंह, महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री यांनी सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेली विकास कामे, साधूग्राम, त्र्यंबकेश्वर येथील दर्शन पथ, रामकाल पथ, भूसंपादन, बाधितांचे पुनर्वसन याविषयी सविस्तर माहिती दिली.

# संपत्ती लपवणाऱ्या ६८ हजार राज्य सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भ्रष्टाचाराची कीड हळुहळू सारंच पोखरत निघालीय. भ्रष्टाचार हा देशासमोरील मोठे आव्हान बनला आहे. यासाठी भ्रष्टाचारविरोधी कायदा अधिक कठोर करण्यात आलाय. माहितीचा अधिकार सामान्य जनतेला ताकद देतो. केंद्र सरकारसोबतच राज्य सरकार कठोरातील कठोर निर्णय घेत असते. उत्तर प्रदेश सरकारने भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर धोरण अवलंबले आहे. इथल्या राज्य सरकारने काय घेतलाय निर्णय?

भ्रष्टाचाराविरोधात योगी आदित्यनाथ सरकारने धोरण आणलय. त्यानुसार सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या चल आणि अचल संपत्तीचा पूर्ण तपशील मानव संपदा पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. मुख्य सचिव एसपी गोयल यांनी याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत हा तपशील सादर करावा लागणार आहे. हे उत्तर प्रदेश सरकारी कर्मचारी आचरण नियमावली १९५६ च्या नियम २४ नुसार आहे. या नियमाचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जानेवारी महिन्याचा पगार फेब्रुवारीमध्ये मिळणार नाही. सरकारची ही कारवाई भ्रष्टाचाराला थारा न देण्याच्या उद्देशाने आहे. ज्यामुळे कर्मचाऱ्यांना आपल्या कामात पारदर्शकता राखणे आवश्यक झाले आहे.

**संपत्तीचा तपशील न सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या**

राज्यातील एकूण ८ लाख ६६ हजार २६१ सरकारी कर्मचाऱ्यांपैकी ७ लाख ९८ हजार २५ कर्मचाऱ्यांनी वेळेत आपली संपत्ती जाहीर केली. मात्र ६८ हजार २३६ कर्मचाऱ्यांनी शनिवार रात्रीपर्यंत हा तपशील अपलोड केला नाही. यात तिसऱ्या श्रेणीचे ३४ हजार ९२६ कर्मचारी सर्वाधिक आहेत. त्यानंतर चौथ्या श्रेणीचे २२ हजार ६२४, दुसऱ्या श्रेणीचे ७ हजार २०४, पहिल्या श्रेणीचे २ हजार ६२८ अधिकारी आणि इतर ८५४ कर्मचारी आहेत. हे सर्वजण सरकारच्या आदेशाचे उल्लंघन करत असल्याने त्यांचा पगार रोखण्यात येणार आहे. ही संख्या एकूण कर्मचाऱ्यांच्या ८ टक्के आहे.

**कोणत्या विभागातील कर्मचाऱ्यांवर कारवाई?**

संपत्ती जाहीर न करणारे कर्मचारी विविध विभागांमध्ये आहेत. यात लोक निर्माण विभाग, महसूल विभाग, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभाग, समाज कल्याण, महिला कल्याण, सहकारिता, उत्पादन शुल्क, अन्न पुरवठा, वैद्यकीय शिक्षण, आरोग्य, ग्रामीण अभियांत्रिकी, उद्यान विभाग, पशुपालन आणि वाहतूक विभाग यांचा समावेश आहे. हे विभाग राज्याच्या विकास आणि जनसेवेसाठी महत्त्वाचे आहेत. कर्मचाऱ्यांच्या या निष्काळजीपणामुळे या विभागांच्या कामकाजावर परिणाम होऊ शकतो, ज्यांनी तपशील सादर केला नाही त्यांचा पगार थांबवावा, अशा सूचना सरकारने विभाग प्रमुख आणि वेतन वितरण अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

सरकारची भ्रष्टाचारविरोधी भूमिका योगी सरकार भ्रष्टाचाराला कुठलाही थारा देणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून दिला जात आहे. कर्मचाऱ्यांनी आपली संपत्ती लपवण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई होऊ शकते. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण होईल आणि पारदर्शक प्रशासनाला प्रोत्साहन मिळणार आहे. ज्यांनी तपशील दिला नाही त्यांचा पगार रोखण्यामुळे त्यांना आर्थिक अडचणी येऊ शकतात पण हे पाऊल सरकारच्या धोरणाला मजबूत करणारे ठरणार आहे.

**संपत्ती जाहीर करण्याची प्रक्रिया**

मानव संपदा पोर्टलवर संपत्तीचा तपशील अपलोड करण्याची प्रक्रिया सोपी आहे. कर्मचाऱ्यांना २०२५ पर्यंतची संपत्तीची माहिती देणे आवश्यक होते. ज्यांनी अद्याप हे केले नाही त्यांना तातडीने ही प्रक्रिया करावी लागणार आहे. अन्यथा पगार रोखण्याबरोबरच अन्य दंडात्मक कारवाई होऊ शकते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन निर्माण करण्यासाठी सरकारची ही मोहीम असून यामुळे राज्यातील प्रशासन सुधारण्यासाठी मदत होईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी समजून घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हरित महाराष्ट्रसाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा : मुख्यमंत्री

(पान १ वरून...)

तपासणी करण्यात येणार आहे.

मनरेगा, कॅम्पा, कृषी विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांद्वारे तीन ते पाच वर्षांची निगा सुनिश्चित करण्यात आली आहे. तथापी वृक्ष जगण्यासाठी हा कालावधी १० वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून भूजल पुनर्भरण, मातीची सुपीकता, जैवविविधता वाढीसोबतच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच गोविंदराज, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मृद व जलसंधारण सचिव गणेश पाटील, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटरचे (एम आरएसएसी) चे संचालक श्री. कोलते आदी उपस्थित होते.

# कुंभमेळा ही संधी समजून सर्व यंत्रणांनी जबाबदारीने 'ॲक्शन मोड'मध्ये कामे करा : मंत्री गिरीश महाजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा यशस्वी होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी ही संधी समजून जबाबदारीने काम करावे. कुंभमेळ्यासाठी सुरू असलेली विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार तसेच विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी प्रत्येक यंत्रणेने 'ॲक्शन मोड'मध्ये कामे करावीत, असे स्पष्ट निर्देश जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिले.

नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने आज आयोजित करण्यात आलेल्या गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध अंमलबजावणी यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रयागराज येथील कुंभमेळ्याचा अनुभव लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे जागेची मर्यादा असल्याचे मंत्री महाजन यांनी नमूद केले. नाशिकमधील रामकुंड तसेच त्र्यंबकेश्वर येथील जागा मर्यादित असून, त्या तुलनेत भाविकांची संख्या चार ते पाच पटीने वाढणार आहे. त्यामुळे गर्दी व्यवस्थापनासह पायाभूत सुविधांचे सखोल व शिस्तबद्ध नियोजन होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कुंभमेळ्यासाठी शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून दिला असून, या निधीचा कोणत्याही प्रकारे अपव्यय होणार नाही याची दक्षता सर्व यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. देशभरातून तसेच जगभरातून भाविक कुंभमेळ्यासाठी येणार असल्याने, त्यांनी नाशिक–त्र्यबज्ञाफेश्वर कुंभमेळा अत्यंत सुरेख, नियोजनबद्ध आणि सुयोग्यरीत्या पार पडल्याची भावना व्यक्त करावी, या दृष्टिकोनातून सर्व यंत्रणांनी आणि प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने कामे पार पाडावीत, असेही मंत्री महाजन म्हणाले. रस्ते, काँक्रीटीकरण, गोदावरी स्वच्छता तसेच मलनिस्सारण प्रकल्पांच्या कामांमुळे नागरिकांना काही प्रमाणात तात्पुरती गैरसोय होऊ शकते; मात्र ही सर्व कामे गुणवत्तेची कोणतीही तडजोड न करता दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाली पाहिजेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. विकासकामे करताना कोणतीही चूक होणार नाही, यासाठी कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी. कामांमध्ये त्रुटी आढळल्यास शासन जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कारवाई करण्यास मागे-पुढे पाहणार नाही, असेही त्यांनी सांगितले. गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळा ही यासाठी दिशादर्शक व मोलाची ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यशाळेत बोलताना विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रवीण गेडाम यांनी गुणवत्ता नियंत्रण हे नियोजन आणि अंमलबजावणीचा अविभाज्य भाग असल्याचे नमूद केले. सिंहस्थ कुंभमेळ्यासारख्या महाआयोजनासाठी तांत्रिक मानकांचे काटेकोर पालन, सातत्यपूर्ण देखरेख तसेच सर्व यंत्रणांमधील समन्वय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी नाशिकमधील पावसाळ्याचा विचार करूनच कामांचे नियोजन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. पावसाळ्याची कालावधी व तीव्रता कामांच्या गुणवत्तेवर परिणाम करणार नाही, यासाठी अभियांत्रिकी नियोजन, साहित्य निवड व अंमलबजावणीचे वेळापत्रक हवामानाशी सुसंगत असावे, असे त्यांनी सांगितले. गुणवत्ता तपासणी, देखरेख तसेच तृतीय-पक्ष गुणवत्ता हमी यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठीच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यशाळेत आयआयटी मुंबईचे डॉ. धर्मवीर सिंह यांनी बिटुमिनस तसेच काँक्रीट रस्त्यांच्या बांधकामातील महत्त्वाच्या तांत्रिक बाबी, लवचिक व कठीण रस्त्यांचे निकष यावर सविस्तर मार्गदर्शन केले. विकास ठाकर यांनी नागरी पायाभूत सुविधा समन्वय, पावसाळी पाणी व्यवस्थापन, कामांची गुणवत्ता व नियंत्रण याविषयी माहिती दिली. तृतीय-पक्ष गुणवत्ता नियंत्रण संस्थेचे अविनाश आठवले व वैभव भोसले यांनी आयएसओ १७०२०:२०१२ मानकांनुसार तपासणी, निरीक्षण व अहवाल प्रक्रियेचे सादरीकरण केले. देवलाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचे पियुष पाटील यांनी विविध परवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी, अंमलबजावणी यंत्रणांचे अभियंते तसेच गुणवत्ता नियंत्रण व तृतीय-पक्ष तपासणी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई

## पंढपूरात शहर पोलीसांची १०५ वाहनांवर कारवाई: ५७ हजारांचा दंड वसूल





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर पंढरपूर शहर पोलीसांनी रविवारदि.०१ फेब्रुवारी रोजी विशेष मोहीम राबवली. यामध्ये १०५ वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करुन ५७ हजार ९०० रुपये दंड वसुल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे यांनी दिली.

पंढरपूर शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी दररोज मोठ्या प्रमाणात भाविक येतात तसेच शहरात मोठी बाजारपेठ , दवाखाने, शासकीय कार्यालयात कामकाजासाठी दररोज विविध भागातील हजारो नागरिक दुचाकी, चार चाकी अथवा इतर वाहनांने येतात. मात्र गेल्या काही दिवसांपासून ट्रिपल प्रवास, फॅन्सी नंबर, विना परवाना, विना नंबर, कर्कश आवाजाचे सायलन्सर बसविणे तसेच विरुध्द दिशेन गाडी चालविणे यामुळे सतत वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. याला आळा घालण्यासाठी शहर पोलीसांनी विशेष मोहिम राबवून १०५ वाहनचालकांवर कारवाई केली.

सदर कारवाई सहा पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, शहर पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, वाहतुक शाखेचे ठाणे अंमलदार, होमगार्ड यांनी केली.



# अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नारायण कारंजकरांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर तरुण भारतचे व सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तसेच प्रसिद्ध ज्योतिषभास्कर श्री.नारायणराव कारंजकर यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित तरुण भारत माजी कर्मचारी समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

श्री.कारंजकर यांच्या जुळे सोलापूर भागातील शिवगंगा नगरातील निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात तरुण भारतचे माजी संपादक श्री.अरविंदजी जोशी यांच्या हस्ते शाल व बुके देऊन श्री.कारंजकर व त्यांच्या पत्नी सौ.सुमती कारंजकर यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना समितीच्यावतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी समितीचे कार्याध्यक्ष श्री.दशरथ वडतिले, सचिव श्री.सुनील आराध्ये, खजिनदार श्री.सतीश पाटील, श्री.राजेंद्र खमितकर तसेच श्री.कारंजकर यांचे सुपुत्र प्रा.महेश, अविनाश व मुलगी सौ.शुभदा गणोरे आदी उपस्थित होते.मूळचे कुर्डुवाडीचे असलेले श्री.नारायणराव कारंजकर यांनी पत्रकारितेत पन्नासहून अधिक वर्षे विविध पदावर काम केले, ते अनेक पुरस्कारांनी सन्मानित आहेत. त्यांचा आयुर्वेद व ज्योतिषावर खूप अभ्यास आहे. ते २०११ते २०१६या काळात तरुण भारतचे संपादक होते.

# गावाचा पायाभुतं विकासासाठी मायबाप मतदार बंधु -भगिनींनो मला सधी द्या : गणेश बिराजदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : मराठी माणसाची अस्मिता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय राज साहेब ठाकरे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली मी तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी पंचायत समिती गणातून निवडणूक लढवीत असून मायबाप मतदार बंधू भगिनींनी मला गावाच्या पायाभूत विकासासाठी आणि आपली प्रामाणिकपणे सेवा करण्याकरिता रेल्वे इंजिन या चिन्ह समोरील बटन दाबून मला विजय करून काम करण्याची संधी द्यावी असे कळकळीची विनंती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे



तरुण आणि तडफदार उमेदवार गणेश बालाजी बिराजदार यांनी वागदरी येथे आयोजित कॉर्नर सभेत बोलताना केले.

तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गट अंतर्गत येणाऱ्या खुदावाडी पंचायत समिती गणातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले सर्वात तरुण युवा कार्यकर्ते गणेश बिराजदार यांच्या प्रचारार्थ वागदरी येथे कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी ग्रामदैवत श्री संत भगवान सिंग महाराज श्री हनुमान मंदिर व श्री मल्लिकार्जुन महादेव मंदिर यांचे दर्शन घेऊन छत्रपती राजे संभाजी महाराज व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पुष्पहार घालून अभिवादन करून गावात पदयात्रा करण्यात आली आणि यानंतर मुख्य चौकात कॉर्नर सभा झाली. यावेळी उमेदवार गणेश बिराजदार मतदारांना संवाद साधताना बोलत होते. या प्रसंगी गावातील ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# अक्कलकोट न.प बांधकाम सभापतीपदी पै. सद्दाम शेरीकर व आरोग्य समितीच्या सभापतीपदी अविनाश मडीखांबे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट नगरपरिषद निवडणुक २०२५-२६ निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ मधून भरघोस मतांनी निवडून आलेले पै. सद्दाम शेरीकर यांची न.प सार्वजनिक बांधकाम सभापती पदी निवड झाल्याबद्दल व प्रभाग क्रमांक ४ चे अविनाश मडीखांबे यांची वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापती पदी निवड झाल्याबद्दल एस एस सोशल ग्रुप पंच तालीम, सद्दाम शेरीकर मित्रपरिवार व कारंजा चौक मित्रपरिवार व प्रभाग क्र.९ मौलाली गल्ली यंग कमिटी तर्फे अक्कलकोट नगरीचे बुलंद आवाज नगरसेवक, बांधकाम सभापती मा.श्री सद्दाम शेरीकर व नगरसेवक सार्वजनिक आरोग्य सभापती अविनाश मडीखांबे यांचा मक्का मस्जिद परिसर, आरिफ शेरीकर चौक येथे फटाक्याच्या आतिषबाजी शाल, हार,पुष्पगुच्छ फेटा,टोपी घालून भव्य दिव्य सत्कार करण्यात आला.

या वेळी शहानुर मुल्ला, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, युनुस शेख, अकिब शेरीकर, अजीम शेरीकर, हुसेन शेख (पेढा), सैपन शेख, अकिब फरास, फयाज इनामदार, मुबारक शेख, शहानवाज गोलंदाज, साहिल नागुरे, सोहेल बागलकोटे, नवाज शेख, शाहिद दारूवाले, अजीम अत्तार व एस एस सोशल ग्रुपचे कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवर व एस एस सोशल ग्रुपचे कार्यकर्ते, वार्ड क्रमांक९ चे मतदारांचे व मित्र परिवारांचे आभार सद्दाम शेरीकर व अविनाश मढीखांबे यांनी मानले.

# नव्या पिढीने आधुनिक शेतीकडे वळावे : पालकमंत्री गुलाबराव पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जळगाव : नव्या पिढीने आधुनिक शेती विषयी नवनवीन माहिती घेऊन आधुनिक शेतीकडे वळणे आवश्यक आहे तसेच शेतीमध्ये 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.असे आवाहन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

खान्देशची समृद्ध कृषी परंपरा, लोकसंस्कृती आणि पशुधनाचा वारसा जपणाऱ्या 'खान्देश कृषी संस्कृती व पशुप्रदर्शन २०२६' या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन आज राज्याचे पाणीपुरवठा स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते शिवतीर्थ मैदान, जळगाव येथे झाले त्यावेळी ते बोलत होते.

उद्घाटनप्रसंगी आमदार सुरेश भोळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करणवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ महेश्वरी रेड्डी, महानगरपालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी प्रकल्प संचालक राजू लोखंडे, जिल्हा कृषी अधीक्षक कुरबान तडवी विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

भाषणाच्या सुरुवातीला पालकमंत्री यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करत, शेतकरी, कामगार, महिला आणि युवकांचे एक मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व आपण गमावल्याची भावना व्यक्त केली.

पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले, आधुनिक शेती करण्यासाठी आज बरीचशी माहिती उपलब्ध आहे तिचा वापर करून युवकांनी शेतीमध्ये चांगले उत्पादने घ्यावे, युवकांनी शेतीकडे व्यवसाय म्हणून पहावे आणि आधुनिक शेती स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर कृषी, पशुसंवर्धन आणि संस्कृती या तिन्ही घटकांचा संगम साधणारा हा महोत्सव असून, भविष्यात तो राज्यात आणि देशातही ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ''हा महोत्सव म्हणजे जिल्ह्याचा अभिमान आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

महिला बचत गटांनी आज गावाची अर्थव्यवस्था बदलून टाकली आहे. ''महिला म्हणजे फक्त घराची जबाबदारी सांभाळणाऱ्या नाहीत, तर त्या संपूर्ण गावाच्या विकासाच्या शिल्पकार आहेत,'' असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

शेतकरी आणि पशुधन यांचे नाते अतूट असल्याचे सांगत पालकमंत्री म्हणाले की, ग्रामीण भागात जनावर म्हणजे केवळ मालमत्ता नसून कुटुंबाचा अविभाज्य घटक आहे. पशुपालनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होत असल्याचेही त्यांनी नमूद करून ते म्हणाले सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे.

जिल्हाधिकारी श्री घुगे आपल्या मनोगत म्हणाले, जळगाव जिल्हा कृषी प्रधान जिल्हा असून खाद्य संस्कृतीचा जिल्हा आहे कृषी विभागाचे संवर्धन व्हावे या उद्देशाने खान्देशी संस्कृतीचा महोत्सव ही संकल्पना लक्षात घेऊन हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या कृषी प्रदर्शनात कृषी तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, पशुसंवर्धन मत्स्य संवर्धन कसे करावे यासह शासनाच्या योजनांची माहिती, विविध खाद्यपदार्थ स्टॉल या ठिकाणी लावण्यात आले असून शाळा महाविद्यालयाच्या सहली, शेती विषयावर चर्चासत्र सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी पुढील पाच दिवस करण्यात येणार आहे याचा जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी कृषी प्रदर्शन आयोजना विषयी सविस्तर माहिती सांगितली.

कार्यक्रमात, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यामार्फत तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिका व डायरीचे तसेच कृषी विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या महाविस्तार ए आय ॲप, प्रकाशन पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पालकमंत्री श्री पाटील यांनी या प्रदर्शनस्थळी लावण्यात आलेले विविध स्टॉलला भेट देऊन माहिती जाणून घेतली. तसेच पालकमंत्री यांनी प्रदर्शनातील स्टॉलवरुन स्वत: वस्तू खरेदी करुन इतरांना प्रोहत्सान दिले. यावेळी कार्यक्रमात विविध सांस्कृतीक कार्यक्रम सादर करण्यात आले.

प्रदर्शनाची वैशिष्ट्ये :-

प्रदर्शनात कृषी निविष्ठा, अवजारे व साहित्याचे भव्य प्रदर्शन, शासकीय योजनांची सविस्तर माहिती व विविध प्रात्यक्षिकांची मांडणी, तसेच हस्तकला व गृहसजावटीच्या वस्तूंची आकर्षक दालने नागरिकांचे विशेष आकर्षण ठरत आहेत. कृषी व पशू विभागामार्फत शेतकरी बांधवांसाठी मार्गदर्शन, चर्चासत्रे, उद्योजकता विकास व महिला सक्षमीकरण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

प्रदर्शनाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे अहिराणी लोकपरंपरा व संस्कृतीचे सजीव दर्शन, पारंपरिक लोककला व लोकनृत्यांचे सादरीकरण आणि अस्सल महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांची जत्रा. खवय्यांसाठी विविध खाद्यपदार्थांची पर्वणी आहे. हे प्रदर्शन दि. १ ते ५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार असून, शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाला शेतकरी बांधव, महिला बचत गट प्रतिनिधी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### म्हशी चोरीप्रकरणी तामलवाडी पोलिसांची कामगिरी

# जनावरे चोरट्यांना तामलवाडी पोलीसांनी घेतले ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/एस. के. गायकवाड : माहे डिसेंबर २२५ मध्ये तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलीस ठाणे येथे येथे जनावरे (म्हशी) चोरी गेल्याचा गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्यांच्या संबंधाने तपास केला असता तामलवाडी पोलीसाना ताणंत्रिक विश्लेषणावरून व गोपनीय बातमीदार यांच्या मदतीने माहिती मिळताच दोन संशयित इसमाना पकडून चौकशी केली असता त्यानी गुन्ह्यांची कबूली दिल्यावरून त्यांना ताब्यात घेतले आहे.

याबाबत पोलीस सुत्राकडून मिळालेली माहिती असे की, माहे डिसेंबर २५ मध्ये तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या मौजे नांदुरी येथिल जनावरे चोरी गेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.



या गुन्ह्यांच्या संबंधाने धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्रीमती रितू खोखर मॅडम व अप्पर जिल्हा पोलीस अधिक्षक शफाकत आमना मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी तुळजापूर श्री निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तामलवाडी पोलीसानी तपास केला असता ताणंत्रिक विश्लेषणावरून व गोपनीय बातमीदारा मार्फत माहित मिळाल्यावरून दोन संशयीत इसमाना ताब्यात घेऊन त्यांना विश्वासात घेत सखोल चौकशी केली असता त्यानी नांदुरी येथून तिन म्हैसी चोरून नेल्याचे कबूल करून आपली नावे सागितली ती पुढील प्रमाणे १) अजिम निजाम सय्यद व २) निलेश नागनाथ तानवडे दोघे रा. सावरगाव ता. तुळजापूर असी सांगितल्यावरून त्यांच्यावर तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्यांच्या कडे अधिक चौकशी केली असता त्यानी तिन म्हैशी पैकी एक म्हैस लातूर येथिल सोहेल साजिद कुरेशी याना विकल्याचे सांगीतल्यावरून पोलिसानी सोहेल कुरेशी यांच्या कडून म्हैशीची विक्री किंमत ताब्यात घेतली व आरोपी अजिम निजाम सय्यद यांच्या कडून दोन म्हशी ताब्यात घेतल्या.या प्रकरणी तामलवाडी पोलीस ठाण्यात तिघा जनांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणात वापरण्यात आलेले वहान पोलीसनी ताब्यात घेतले आहे.

सदरील कामगिरी तामलवाडी पोसठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिकक्ष गोकुळ ठाकूर, सपोउनि प्रदिप टेकाळे, पोह.१९८ तोगी, १५३१ काझी,१५२३सुरज नरवडे, ३११ गोपाळ सलगर, १५९९ गायकवाड, ५३६ शेख, नितीन भोसले आदीनी पार पाडली.

# माहिती तंत्रज्ञान, एव्हीजीसी आणि आतिथ्य क्षेत्रांमध्ये दिव्यांगजनांना गरजेनुसार प्रशिक्षण देण्यासाठी 'दिव्यांग कौशल्य योजना'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आज संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२०२७ सादर करताना केंद्रीय अर्थ व कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की 'सबका साथ, सबका विकास' ही आमची दृष्टी असून, प्रत्येक कुटुंब, समुदाय, प्रदेश आणि क्षेत्राला अर्थपूर्ण सहभागासाठी आवश्यक साधनसंपत्ती, सुविधा आणि संधी उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अर्थमंर्त्यांनी दिव्यांगजनांसाठी केलेल्या घोषणा पुढीलप्रमाणे -

**दिव्यांग कौशल्य योजना:**

माहिती तंत्रज्ञीन, एव्हीजीसी (ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स), आतिथ्य तसेच अन्न व पेय क्षेत्रांमध्ये दिव्यांगजनांसाठी अनुकूल कार्याभिमुख आणि प्रक्रिया-केंद्रित भूमिका उपलब्ध आहेत. या योजने अंतर्गत प्रत्येक दिव्यांग गटाच्या गरजेनुसार उद्योग-सुसंगत व अनुकूल प्रशिक्षण देऊन उपजीविकेच्या सन्माननीय संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

**दिव्यांग सहारा योजना:**

सर्व पात्र दिव्यांगजनांना उच्च दर्जाची सहाय्यक उपकरणे वेळेवर उपलब्ध होणे ही मूलभूत गरज आहे.

या अर्थसंकल्पात (ग) सहाय्यक उपकरणांच्या उत्पादनात वाढ, संशोधन व विकास तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता एकात्मिकरणासाठी भारताचे कृत्रिम अवयव उत्पादक महामंडळ - 'एएलआयएमसीओ'ला पाठबळ देणे, (ग) प्रधान मंत्री दिव्याशा केंद्रांचे बळकटीकरण आणि दिव्यांगजन व ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक उत्पादने वापरून पाहून खरेदी करता येतील अशी आधुनिक किरकोळ प्रकारची'सहाय्यक तंत्रज्ञान केंद्र' उभारण्याचा प्रस्ताव आहे.

# आमच्यावर बोलायला पालकमंत्र्यांना यावं लागतंय : भगीरथ भालके

## विरोधकांना गल्लीबोळात फिरावे लागते, आमदार अभिजीत पाटील यांची जाहीर टीका; वाखरी गटातून संग्राम गायकवाड यांचा पाठिंबा; भंडीशेगाव प्रचार सभेत भालके यांनी घेतले कल्याणराव काळे यांना फैलावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका अंतिम टप्प्यात आले आहेत. यामध्ये पंढरपूर तालुक्यातील विठ्ठल परिवारामध्ये विभागणी झाली होती. परिवाराचे तीन विभाग पडले होते. त्यामधील माढ्याचे आ.अभिजीत पाटील आणि विठ्ठलचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांनी आपल्या समर्थक कार्यकर्त्यांचे वेगवेगळे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले होते. ही बाब पंढरपूर तालुक्यातील कार्यकर्त्यांना पचनी पडत नव्हती. वरील दोघांनी युती करून निवडणूक लढवावी असा आग्रह कार्यकर्त्यातून धरला जाऊ लागला होता. यामुळे त्यांनी युती करण्यात आली असल्याचे जाहीर करून टाकले होते. त्या युतीचे रूपांतर पाठिंबा देण्यापर्यंत गेले आहे. वाखरी जिल्हा परिषद गटातील उमेदवार हे आ.अभिजीत पाटील यांच्या गटाचे आहेत. या उमेदवारांना भालके गटाचे उमेदवार संग्राम गायकवाड यांनी भंडीशेगाव येथील सभेमध्ये उपस्थित राहून पाठिंबा व्यक्त केला आहे. त्यामुळे उमेदवार मयुरी बागल यांच्या विजयाचा मार्ग सोपा झाला आहे.

भंडीशेगाव येथे संयुक्त प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी





विठ्ठलची माजी चेअरमन भगीरथ भालके यांनी थेट सहकार शिरोमणीचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्यावर आग पाकड करीत त्यांच्या राजकीय कटकारस्थानाचा पाढा उपस्थित विठ्ठल परिवाराच्या कार्यकर्त्यासमोर मांडला. केवळ विठ्ठल परिवाराच्या नावाखाली एकत्रित येण्याची भाषा बोलायची आणि वेळ आल्यानंतर वेगळी भूमिका घ्यायची हेच त्यांनी अनेक वेळा केल्याचे आपणास पहावयास मिळाले आहे. स्वर्गीय भारत नानांच्या निधनानंतर आम्ही आपणाला वडीलधारी या नात्याने कायम सन्मान देत आलो होतो. मात्र आपण ठरलेली भूमिका न स्वीकारता कायम वेगळी भूमिका घेऊन मला अडचणीत आणण्याचा मोठा प्रयत्न केला असल्याचे जाहीर केले आहे. गळ्यात घड्याळाचा पंचा घालायचा आणि उमेदवारी फॉर्म मात्र कमळाचा भरायचा. असला डाव खेळायला नको होता. असेही भगीरथ भालके यांनी यावेळी सांगितले. ज्या सरकारने घरकुल धारकांना ५०हजार रुपयाची जादा अनुदान देण्याचे आश्वासन दिले होते. त्याचबरोबर प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचे आश्वासन हे दिले होते त्या आश्वासनाचे नेमके काय झाले? असा सवाल ही तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांनी सरकारला स्पष्टपणे विचारला आहे.

याप्रचार सभेमध्ये माढा-पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या भाषणामध्ये बोलताना सांगितले की, वाखरी जिल्हा परिषद गट हा हॉटस्पॉट आणि चर्चेतील आहे. या ठिकाणी निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक होते. मात्र घड्याळाचा पंचा गळ्यात घालून कमळ घेतलं. असही एक प्रकार पहावयास मिळाला आणि या ठिकाणी असलेल्या यलमर यांच्यावर अन्याय झाला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. परंतु हल्ली आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री मात्र कोणत्याही गल्लीबोळात फिरून या निवडणुकांमध्ये ही लक्ष घालत आहेत. यामुळे आमच्यासाठी पालकमंत्र्यांना यावं लागतं हीच आमच्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. असे सांगत निधी मिळणार नसल्याची भीती दाखवली जात आहे. त्यामुळे पालकमंत्री साहेब आपण जरा सबुरीने घ्यावे असा सल्ला ही आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी दिला. आम्ही तुमच्याकडे येत असताना स्वतःला उमेदवारी मागण्यासाठी येत नसून मतदारसंघातील लोकांच्या हिताची कामे आणि विकास निधीसाठी यत असल्याचेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. मागील पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये गणामध्ये पराभूत झालेल्या समाधान काळे यांना आता गटाची उमेदवारी दिली आहे. असे उपयोजित पणे सांगत त्यांचा आपण या निवडणुकीतही नक्की पराभव करू असेही सांगितले आहे. संग्राम गायकवाड यांनी दिलेला पाठिंबा वाया न घालवता, त्यांचा येतोचित सन्मान केला जाईल असेही आवर्जून सांगितले.

मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये कल्याणराव काळे यांनी आमच्या विरोधात येऊन गल्लोगल्ली येऊन प्रचार केला .आम्ही प्रत्येकाची मूठ बांधण्याचा प्रयत्न करत होतो .परंतु कल्याणराव काळे यांनी प्रत्येक पक्षात दोन दोनदा जाण्याची भूमिका त्या ठिकाणी ठेवली. त्यांना आता जागा दाखवण्याची वेळ आली असल्याचे मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी सांगितले.

यावेळी प्रा.तुकाराम मस्के, तानाजी बागल, दीपक पवार, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष वर्षाराणी शिंदे, समाधान गाजरे ,दत्ता नागणे, सुधाकर सुरवसे, बाळासो बागल, रणजीत बागल, पार्थ सुरवसे आदींनी भाषणे केली.

यावेळी पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष आणि विद्यमान नगरसेवक नागेश भोसले, पंचायत समितीचे माजी उपसभापती विष्णू भाऊ बागल, विठ्ठलचे माजी संचालक सूर्यकांत बागल, सुभाष गोडसे ,संग्राम गायकवाड, साहेबराव नागणे, हनुमंत बागल, चंद्रकांत पाटील, धनंजय काळे, विठ्ठलचे माजी संचालक बिभिषन पवार, विठ्ठल गाजरे यांचे सह विठ्ठल परिवारातील अनेक पदाधिकारी आणि वाखरी गटातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या हिताच्या बाबी पालकांनी ओळखाव्यात : प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः'या स्पर्धेच्या युगात करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी 'हार्ड वर्क' करण्याची गरज आहे. 'हार्ड वर्क' केल्यामुळे कंपनी अथवा आपण जिथे नोकरी करतो तिथे आपली आओळख निर्माण होते. एकाग्रतेमुळे यश मिळण्याची शक्यता अधिक असते म्हणून पालकांनी निदान शैक्षणिक काळात विद्यार्थ्यांप्रती भावनिक न होता त्यांच्या हिताच्या बाबी ओळखाव्यात व त्या बाबींना प्राधान्य द्यावे.' असे प्रतिपादन स्वेरीचे संस्थापक व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट मधील इंजिनिअरिंग व फार्मसी, लॉ, एमबीए, एमसीए, या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात तसेच थेट द्वितीय वर्ष इंजिनिअरिंग व फार्मसीला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजिलेल्या स्वागत समारंभाच्या निमित्ताने 'ज्ञानसंवाद' च्या माध्यमातून स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे हे मार्गदर्शन करत होते. प्रारंभी विद्यार्थी व पालकांचे गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले. व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणुन अॅड. ज्ञानेश आराध्ये व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ. माधुरी गवंडी हे उपस्थित होते. प्रारंभी डॉ.यशपाल खेडकर यांनी प्रास्ताविकात 'स्वेरीची यशस्वी वाटचाल आणि त्याला लाभलेले डॉ.बी.पी.रोंगे सरांचे नियोजनबद्ध नेतृत्व' यावर सविस्तर माहिती दिली. पुढे मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.रोंगे म्हणाले की, 'आपण जर ठरवले तर आपण आपल्यात बदल

### स्वेरीत 'ज्ञानसंवाद' हा समारंभ संपन्न

घडवू शकतो. कठीण प्रसंगात संयम, परिस्थितीची जाणीव आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर आपण यशाला गवसणी घालू शकतो. सध्याचे युग हे संगणकाचे आहे. असे असतानाही आपण लेखनावर अधिक भर दिला पाहिजे कारण लिहीलेले अधिक लक्षात राहते. हेच स्वेरीचे वेगळेपण असून यावर खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या करिअरची इमारत उभी आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी यशस्वी झाल्यास आनंदाने हुरळून जायचे नाही आणि अपयश आल्यास खचून जायचे नाही' हे तंत्र बाळगले पाहिजे. त्याचबरोबर पालकांनी आपल्या पाल्याचे करिअर उज्वल करण्यासाठी मुळीच भावनिक होऊ नये. आपल्या पाल्यांना घडविण्यासाठी येथील उच्चशिक्षीत प्राध्यापक वर्ग सक्षम आहेत.' असे सांगून 'टीव्ही, मोबाईल व तथाकथित मित्र' या तीन गोष्टींपासून स्वतःला दूर राहण्याचा कानमंत्रही प्राचार्य डॉ. रोंगे यांनी दिला. याप्रसंगी राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, सौ. मोहितकर, विश्वस्त एच.एम. बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, स्वेरीचे सचिव डॉ.सुरज रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतिश मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वैशाली अचकनळळी, प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.सचिन गवळी, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व विविध भागातून आलेले सुमारे दोन हजार विद्यार्थी व पालक या कार्यक्रमास उपस्थित होते. डॉ. यशपाल खेडकर यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले.

# भव्य काव्य संमेलन व सन्मान सोहळ्यात प्रवीण बागडे यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर/प्रतिनिधी : कविता ही केवळ भावनांची अभिव्यक्ती नसून समाजाचे आरसेपण जपणारे प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. याच विचारातून कविता म्हणजे प्रबोधन या संकल्पनेतून संगमनेर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महोत्सव कवितांचा' या भव्य काव्य संमेलन व सन्मान सोहळ्यात नागपूर येथील साहित्यिक-कवी प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांचा सन्मान करण्यात आला. हा साहित्यिक व सांस्कृतिक सोहळा रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री कचेश्वर देवस्थान मंदिर, बोटा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडला. या महोत्सवासाठी संगमनेर, राहुरी, पारनेर, जुन्नर, नागपूर आणि अकोला या विविध तालुक्यांमधून निवडक साहित्यिक, कवी, विचारवंत आणि सामाजिक क्षेत्रातील



मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून आधुनिक गाडगेबाबा म्हणून ओळखले जाणारे डॉ. हरिभाऊ उगले उपस्थित होते, तर स्वागताध्यक्ष म्हणून कृषी उपसंचालक श्री प्रविण गवांदे यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळली. काव्यसंमेलनात प्रवीण बागडे यांनी सामाजिक वास्तवावर भाष्य करणाऱ्या आशयपूर्ण व संवेदनशील 'असत्य कथा' या विषयावर तसेच सामाजिक वास्तव मांडणाऱ्या कवितांच्या सादरीकरणासाठी दोन्ही कवींना पुष्प, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल साहित्यिक वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सामाजिक प्रश्नांवरील परखड मांडणी, प्रखर शब्दशैली आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन यामुळे त्यांच्या कविता वाचक-श्रोत्यांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरत आहेत. त्यांच्या सशक्त सहभागामुळे 'महोत्सव कवितांचा' या साहित्यिक उपक्रमाची उंची अधिक वाढली असून साहित्यप्रेमी व रसिकांकडून त्यांच्या कार्याचे स्वागत आणि कौतुक करण्यात येत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून कवितेच्या जोरावर सामाजिक जाणीव जागृत करण्याचा तसेच नव्या साहित्यिक प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गौतम वाघमारे, निवृत्ती कानवडे महाराज, प्रताप गुंजाळ, नवनाथ सरोदे आणि रवि काशिद यांनी विशेष परिश्रम घेतले.

**शेगांव संतनगरीत मुकनायक पत्रकार मेळावा**

**पत्रकार दिन राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व नॅशनल व्हाईस मीडिया फोरम वर्धापन दिनी संयुक्त कार्यक्रम**

# दिल्लीतील पत्रकारांनीच देशाचे वाटोळे केले : भुपेंद्र गणवीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलडाणा : राष्ट्रीय माध्यमांतील पत्रकारांनी दिल्लीत केवळ भांडवलशाही आणि सत्तेची राखण केली. त्यांनी मुकनायक पत्रकारिता केली असती तर देशात आर्थिक, सामाजिक विषमता दिसली नसती. देशाचे वाटोळे करण्यात सत्ताधार्‍यांइतकेच दिल्लीतील पत्रकारांचे योगदान आहे. या शब्दात प्रमुख मार्गदर्शक ज्येष्ठ संपादक भूपेंद्र गणवीर यांनी बुरसटलेल्या पत्रकारितेवर संतनगरी शेगांवात प्रहार केले.

ते मुकनायक पत्रकार दिन राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा-२०२६ आणि नॅशनल व्हाईस मीडिया फोरम वर्धापन दिनाच्या संयुक्त कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. मंचावर मराठी अभिनेता भरत गणेशपुरे, लॉर्ड बुध्दा टीव्हीचे संचालक सचिन मुन, फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष उत्तम वानखेडे, राष्ट्रीय सचिव प्रकाश सरदार अॅड. झाल्टे, दादाभाऊ अभंग, दिनेश निखारे, किरण उपाध्ये आदी होते. गणवीर पुढे




म्हणाले, स्वदेशी आंदोलनाच्या नावावर संघ ,भाजपाने देशातील जनतेला मुर्ख बनविले. भांडवलशाहीला खतपाणी दिले. ती भांडवलशाही व जातीयवादी शक्ती आज हातात घालून नव्वद टक्के जनतेचे शोषण करीत आहे.२०१४ नंतर हे स्वदेशी आंदोलन कुठे गेले ? असा सरळ प्रश्न केला. तसेच सत्ताधार्‍यांच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे देशातील ८० कोटी जनता रेशनच्या धान्यावर जगत आहे. त्या विरूध्द ते कां लिहित,बोलत नाहीत ? असा प्रश्न केला. मुकनायक पत्रकारिता प्रश्न विचारणारी पत्रकारिता होती. ज्या काळात धर्मसंस्थांना व उच्चवर्णियांना प्रश्न विचारणे गुन्हा होता. त्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जो धर्म माणसाला कमी लेखतो. तो धर्म की अन्याय असा प्रश्न विचारला होता. गुलामी फक्त साखळदंडात नसते. ती मनातही असते असे सांगून शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा स्वाभिमानी विचार दिला. आज मुकनायक विचार घराघरात पोहचला. त्यातून घराघरात शिक्षणाचा सुर्य उगवला. त्यातील तुम्ही काही सूर्य या मेळाव्यात आहात.

मेळाव्यातील पत्रकारांना उद्देशून भूपेंद्र गणवीर म्हणाले, आपण व्यवस्थे विरूध्द साक्ष देणारे साक्षीदार म्हणून जमलो आहात. तुम्ही केवळ बातम्या देणारे लोक नाहीत. तुम्ही इतिहासाला दिशा देणारे आहात. या भूमिकेचे मूळ मुकनायक पत्रकारितेत आहे. जखमा आमच्या लपवल्या इतिहासाच्या पानांनी. मुकनायक आला तेव्हा रक्त बोलले शब्दांनी! असे भावनिक उदगार काढीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुकनायक पत्रकारिता पुढे न्या असे आवाहन केले.

लॉर्ड बुध्दा टिव्हीचे संचालक सचिन मून यांनी पुढचा मुकनायक पत्रकार दिनाचा मेळावा दीक्षाभूमीवर घेण्याची घोषणा केली. लॉर्ड बुध्दा हा ऐकमेव बहुजन चॅनेल आहे. बावीस राज्यात लॉर्ड बुद्धा टिवी दिसत आहे असे सांगून या चॅनेलची आतापर्यंतची संघर्षमय वाटचाल झोपडपट्टी ते देशपातळी असा लेखाजोखा मांडला. तेव्हा सभागृहात भावनिक शांतता पसरली होती.

मराठी अभिनेते भरत गणेशपुरे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहून देशावर मोठे उपकार केले. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. ते जागतिक विचारधन आहे. त्यांचा एक ग्रंथ वाचताना आपली दमछाक होते. त्या विचारांच्या पत्रकारांच्या मेळाव्यात मला उपस्थित राहण्याची संधी दिल्याबाबत आयोजकांचे आभार मानले. दादाभाऊ अभंग यांनी भीमा कोरेगाव स्मारक व परिसर ताबा-संघर्षाची माहिती दिली. तालुका मॅजिस्टेड ते हायकोर्ट अशा अकरा ठिकाणी आपण जिंकलो. तरी अद्याप ताबा मिळाला नाही. या संघर्षाला साथ द्या असे आवाहन केले. तर फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष उत्तम वानखेडे यांनी संघटनेची माहिती दिली.आता संघटना तीन राज्यात असून २४ हजार सदस्य नोंदणी झाल्याचे सांगितले.

**भूपेंद्र गणवीर, सचिन मुन यांचा पुरस्काराने सन्मान**

'या कार्यक्रमात ज्येष्ठ संपादक भुपेंद्र गणवीर यांचा विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार आणि लॉर्ड बुध्दा टीव्हीचे संचालक सचिन मून यांचा विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट माध्यम संघटक पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबाबत मराठी अभिनेता भरत गणेशपुरे यांच्या हस्ते शाल, स्मृतींचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याशिवाय अन्य पत्रकारांनाही पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये सनद पटेल, अनिल उंबरकर, संदिप बडगे, महेश बनसोडे, मोहित दामोदर, आतिश खराटे आदिंचा समावेश होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दिनेश निखाडे, किरण उपाध्ये,पदमा मोहड आदींनी परिश्रम घेतले.